ePaper
║ वर्ष - 7 । अंक - 351 ║ UDYAM-MH-26-0158827 ║

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ║ शनिवार, दिनांक 22 जून 2024 ║ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ║ mahaenews.com ║ maha_enews ║ Mahaenews

## ओबीसी समाजाची बैठक 'मॅनेज' होती: मनोज जरांगे!



### आतील पानांत


- पंचांनी मसूदला धावबाद घोषित केले नाही
- मारक्रमच्या कॅचने फिरली मॅच
- सीएसआयआर नेट परीक्षा पुढे ढकलली
- अटल सेतूची दुरवस्था झाल्याचा आरोप


## भारतातील सर्वात लांब सागरी पूल 'अटल सेतू'ला 'भेगा'

# नरेंद्र मोदी भ्रष्टाचाराचे सरदार!

### अटल सेतू कामाच्या दर्जावरून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष पटोलेंची टीका

। मुंबई । महाईन्यूज

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते अटल सेतुचं उद्घाटन करण्यात आलं होतं. मात्र, अवघ्या तीन महिन्यातच या रस्त्यावर भेगा पडल्या आहेत. नवी मुंबईकडील एका भागात अर्धा किलोमीटरपर्यंत रस्ता एक फुट खाली खचला असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलाय. यात महायुती सरकारनं भ्रष्टाचाराच्या सर्व सीमा ओलांडल्या असून, कर्नाटकातील आधीचं भाजपाचं सरकार 40 टक्के कमिशनवालं होतं, तर राज्यातील महायुतीचं सरकार 100 टक्के कमिशनखोर असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केलाय.**





**नाना पटोले यांनी अटल सेतुची केली पाहणी नाना पटोलेंची टीका :**

नाना पटोले यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींसोबत अटल सेतुची पाहणी केली. यावेळी त्यांनी रस्त्याला भेगा पडल्याचं निदर्शनास आणून दिलं. शिवडी न्हावाशेवा प्रकल्पासाठी सरकारनं 18 हजार कोटी रुपये खर्च केले.

त्यासाठी बँकेकडून कर्ज घेतलं आहे. तसंच सदर प्रकल्पाला माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचं नाव देऊन भ्रष्टाचार करणं हे दुर्भाग्यपूर्ण असल्याचा टोला पटोले यांनी लगावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रकल्प उद्घाटनापूर्वी प्रकल्पाची पाहणी करायला हवी होती. पण नरेंद्र मोदी हेच देशातील भ्रष्टाचाराचे सरदार असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला.

**अधिवेशनात जाब विचारणार :**

"भ्रष्टाचाऱ्यांना ईडी, सीबीआयचा धाक दाखवून भाजपात प्रवेश देऊन मंत्री बनवतात. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पर्यावरणाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणात खारफुटीची कत्तल करण्यात आली आहे. एक टेकडीही फोडली असून पर्यावरणाचा ऱ्हास केलाय. उच्च न्यायालयानं या सर्व घटनांमध्ये स्वतः लक्ष घालावं. तसंच काँग्रेस पक्ष या भ्रष्टाचारी सरकारला अधिवेशनात जाब विचारल्या शिवाय राहणार नाही," असं नाना पटोले म्हणाले.

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची टीका :**

अटल सेतू कामाच्या दर्जाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं सोशल मीडियावर पोस्ट करत, मोदी सरकारची गॅरंटी ही पूर्णपणे फसवी असल्याचा आरोप केला आहे. सुविधांच्या नावाखाली निकृष्ट दर्जाची कामं करुन जनतेच्या स्वप्नांना थूकपट्टी लावण्याचं काम मोदी सरकारनं केल्याचा घणाघात या पोस्टच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

अटल सेतूबाबत प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. अटल सेतू पुलाच्या मुख्य भागावर कोणतेही तडे गेले नसल्याचं सांगण्यात आलं आहे. अटल सेतुला तडे गेल्याची अफवा पसरवली जात असून, त्यावर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रकल्प प्रशासनाकाडून करण्यात आलंय. सेतुला जोडणाऱ्या पोहोचमार्गावर किरकोळ भेगा आढळल्या असून, तो पुलाचा भाग नाही. यामुळं पुलाला कोणताही धोका नाही. याबाबत प्रकल्पाच्या ऑपरेशन आणि मेंटेनन्स टीमनं 20 जून 2024 रोजी केलेल्या तपासणीदरम्यान, उजवीकडून मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या रॅम्प क्रमांक 5 अस्फाल्टवर तीन ठिकाणी किरकोळ भेगा निदर्शनास आल्या आहेत.

### एमएमआरडीएने स्पष्टीकरण सादर केले

**नाना पटोले यांच्या या पोस्टनंतर मुंबईत राजकारण तापले आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांची पोस्ट व्हायरल करण्यास सुरुवात केली. बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर पुलाचे बांधकाम करणाऱ्या मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) याप्रकरणी पुढे येऊन आपले स्पष्टीकरण मांडले. प्राधिकरणाने सांगितले की, अटल सेतूला जोडणाऱ्या अप्रोच रोडवर किरकोळ भेगा आढळून आल्या आहेत परंतु पुलाच्या मुख्य भागात कोणतीही तडे नाहीत.**

**सर्व्हिस रोडला भेगा पडल्या, पुलाला नाही – प्राधिकरण**

**अटल सेतूचे प्रकल्प प्रमुख कैलास गंतारा यांनी सांगितले की, अटल पुलाला जोडणाऱ्या सर्व्हिस रोडच्या काही भागात भेगा पडल्या आहेत. पुलाच्या मजबुतीला कोणताही धोका नाही. कोस्टल रोडचे बांधकाम न झाल्याने अखेरच्या क्षणी हा सर्व्हिस रोड बांधण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यात भेगा दिसू लागल्या. ते भरण्याचे काम सुरू आहे. ते म्हणाले की, अटल सेतूला तडे गेल्याच्या बातम्या केवळ अफवा असून लोकांनी त्यावर विश्वास ठेवू नये.**

# एकी राहण्यासाठी एक पाऊल मागे!

## जास्त जागांसाठी आग्रही असल्याचे शरद पवारांचे संकेत

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेच्या निवडणुकीत पक्षाला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र, महाविकास आघाडीत एकी राहण्यासाठी एक पाऊल मागे घेतले, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट केले. आता आगामी विधानसभा निवडणुकीतून आपल्याला राज्य हातात घ्यायचे आहे.**



त्यासाठी तयारीला लागण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना करून विधानसभेला जास्त जागांसाठी आग्रही असल्याचे संकेत पवार यांनी दिले.बारामती दौऱ्यानंतर पवार दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी त्यांनी निसर्ग मंगल कार्यालयात पक्षाची बैठक घेतली. बैठकीला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार यांच्यासह पक्षाचे नवनिर्वाचित आठ खासदार उपस्थित होते. त्या वेळी पवार बोलत होते. पवार म्हणाले, की लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या जागावाटपात पक्षाला जास्त जागा मिळणे आवश्यक हाते. मात्र, आघाडीची एकी कायम राहण्यासाठी दोन पावले मागे घेण्यात आली. एकत्रित राहिल्यामुळे लोकसभा निवडणुकीत यश मिळू शकले. आता राज्य हातात घेण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या कामाला सर्वांनी लागले पाहिजे. आघाडीमध्ये विसंवाद होऊ नये, यासाठी लोकसभा निवडणुकीत कमी जागांवर समाधान मानावे लागले. विधानसभा निवडणुकीत आम्हाला जास्त जागा मिळण्याची अपेक्षा असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले. दरम्यान, शनिवारी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'यशस्विनी सन्मान' पुरस्कारांचे वितरण पवार यांच्या हस्ते होणार आहेबारामती दौऱ्यानंतर पवार दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी त्यांनी निसर्ग मंगल कार्यालयात पक्षाची बैठक घेतली. बैठकीला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार यांच्यासह पक्षाचे नवनिर्वाचित आठ खासदार उपस्थित होते. त्या वेळी पवार बोलत होते. पवार म्हणाले, की लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या जागावाटपात पक्षाला जास्त जागा मिळणे आवश्यक हाते. मात्र, आघाडीची एकी कायम राहण्यासाठी दोन पावले मागे घेण्यात आली.

### एक पाऊल मागे घेतले

एकत्रित राहिल्यामुळे लोकसभा निवडणुकीत यश मिळू शकले. आता राज्य हातात घेण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या कामाला सर्वांनी लागले पाहिजे.आघाडीमध्ये विसंवाद होऊ नये, यासाठी लोकसभा निवडणुकीत कमी जागांवर समाधान मानावे लागले. विधानसभा निवडणुकीत आम्हाला जास्त जागा मिळण्याची अपेक्षा असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले. दरम्यान, शनिवारी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'यशस्विनी सन्मान' पुरस्कारांचे वितरण पवार यांच्या हस्ते होणार आहे.लोकसभेच्या निवडणुकीत पक्षाला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र, महाविकास आघाडीत एकी राहण्यासाठी एक पाऊल मागे घेतले, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट केले. आता आगामी विधानसभा निवडणुकीतून आपल्याला राज्य हातात घ्यायचे आहे. बैठकीला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार यांच्यासह पक्षाचे नवनिर्वाचित आठ खासदार उपस्थित होते. त्या वेळी पवार बोलत होते.

# पोलीस शिपाई भरतीसाठी शिक्षक मैदानात

## पिंपरी शहर पोलीस दलात 262 जागांसाठी 15 हजार अर्ज

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर पोलीस दलातील शिपाई पदाच्या २६२ जागांसाठी भरतीप्रक्रिया सुरू असून, त्यासाठी १५ हजार ४२ अर्ज आले आहेत. त्यामध्ये ६८४४ पदवीधर, तर पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले ८०३ उमेदवार आहेत. पदवी मिळवूनही बेरोजगार असलेले हे तरुण आता पोलीस शिपाई होण्यासाठी मैदानात उतरले असून, त्यात डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक यांचा समावेश आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात शिपाई पदाच्या २६२ जागांची भरती केली जात आहे. १९ जूनपासून भोसरीतील इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलातील मैदानावर प्रत्यक्ष भरतीप्रक्रिया सुरू आहे. ५० गुणांची शारीरिक चाचणी आणि १०० मीटर धावणे, गोळाफेक आणि १६०० मीटर धावणे आदी प्रकारांचा समावेश आहे. बुधवारी ५०० तर गुरुवारी १ हजार जणांना शारिरिक चाचणीसाठी बोलावण्यात आले. मैदानी चाचणीसाठी आलेले बहुतांश तरुण उच्चशिक्षित असल्याचे दिसून आले.अर्जावरून माहिती घेतली असता एक बीएएमएस डॉक्टर, बॅचलर ऑफ इंजिनीअरिंग झालेले २७४, मास्टर ऑफ इंजिनिअरिंग २, बी-टेक ५६, एमटेक ३, एलएलबी ९, बीएड पदवीधारक ६, बीपीएड ८, एमएड २, एमपीएड ३ यांचा समावेश आहे. यासह वेगवेगळ्या क्षेत्रांतील उच्चशिक्षित तरुणदेखील शिपाईपदासाठी नशीब आजमावत असल्याचे समोर आले आहे. अर्ज केलेल्या उच्चशिक्षित उमेदवारांवरून वाढत्या बेरोजगारीचे वास्तव समोर आले आहे. त्याचबरोबर भारतीय सशस्त्र सेनेतील १०१ जवानांनीही अर्ज दाखल केले आहेत. त्यांनाही पोलीस बनण्यासाठी सर्व चाचण्यांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. पहाटे चार वाजल्यापासून या ठिकाणी भरतीसाठी तरुण गर्दी करीत आहेत.मुख्य प्रवेशद्वारावर बारकोड स्कॅनरने हजेरी घेतली जाते. या हजेरीपत्रकावर छायाचित्र व स्वाक्षरी घेतली जाते. त्यानंतर उंची व छाती मोजमाप होते. कागदपत्र तपासासाठी सभागृहात पाठविण्यात येते. तिथेही पात्र झालेल्या उमेदवारांची यादी तयार करून आरएफआयडी टॅग व चेस्ट क्रमांकाचे वाटप केले जाते. त्यानंतर मुख्य मैदानात १०० मीटर धावणे, गोळाफेक, १६०० मीटर धावणे चाचणी घेतली जाते.

### अशी होते शारीरिक चाचणी

पोलीस भरतीमध्ये कर्मचारी यांनी हस्तक्षेप करू नये म्हणून सफेद, नारंगी, पिवळ्या व इतर रंगांच्या पासचे वाटप केले आहे. मैदानातील पोलीस बाहेर येऊ शकत नाहीत.पोलीस कर्मचारी यांना जागा सोडून जाता येणार नाही, अशी सक्त सूचना अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी दिली आहे.शहर पोलीस दलातील शिपाई पदाच्या २६२ जागांसाठी भरतीप्रक्रिया सुरू असून, त्यासाठी १५ हजार ४२ अर्ज आले आहेत. त्यामध्ये ६८४४ पदवीधर, तर पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले ८०३ उमेदवार आहेत. पदवी मिळवूनही बेरोजगार असलेले हे तरुण आता पोलीस शिपाई होण्यासाठी मैदानात उतरले असून, त्यात डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक यांचा समावेश आहे.

# महाराष्ट्रातील पहिले संविधान भवन उभारणीला 'बुस्टर'!

## 'पीएमआरडीए' सक्षम नसेल, तर महापालिकेला भूखंड हस्तांतर करा

### आमदार महेश लांडगेंची मागणी आयुक्त राहुल महिवाल यांना मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय लोकशाही व्यवस्थेचा पाया असलेले भारतीय संविधान आणि जगभरातील लोकशाही देशांच्या घटनांचा अभ्यास करण्यासाठी तसेच संविधान जागृतीकरिता पिंपरी-चिंचवड महापालिका व पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (PMRDA) यांच्या माध्यमातून उभारण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करुनही पीएमआरडीए संविधान भवन उभारण्यासाठी सक्षम नसेल, तर सदर भूखंड पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करा. महापालिकेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिल्या संविधान भवनाची पायाभरणी करु, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

विषेश म्हणजे, संविधान भवनाच्या उभारणीसाठी राज्याचा नगरविकास विभाग आणि मुख्यंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विधानसभा अधिवेशनामध्ये लक्ष वेधणार आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे. परिणामी, पिंपरी-चिंचवडकरांच्या उत्सुकतेचा विषय असलेल्या संविधान भवनाच्या निर्मितीला 'बुस्टर' मिळाला आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महापालिका, पीएमआरडीए आणि महावितरण सह विविध विभागांतील प्रमुख प्रलंबित कामांसाठी महापालिका भवनात बैठक घेण्यात आली. त्यावेळी महापालिका प्रभारी आयुक्त तथा पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, मनपाचे अतिरिक्त आयुक्त, मुख्य अभियंता तसेच विभाग प्रमुख उपस्थित होते.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी २०१९ मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा करुन संविधान भवन उभारणीकरिता आग्रह धरला होता. त्यानंतर महाविकास आघाडीची राज्यात सत्ता आली. या काळात संविधान भवनाचा विषय बाजुला पडला. तसेच, प्राधिकरणाचे विलिनीकरण पीएमआरडीएमध्ये करण्यात आले. 'पीएमआरडीए' पदसिद्ध अध्यक्ष मुख्यमंत्री असतात. दरम्यान, 'पीएमआरडीए'ची अधिकार विभागणी, मनुष्यबळ नियुक्ती या बाबींमुळे संविधान भवनाबाबत सल्लागार नियुक्ती, प्रकल्प अहवाल याबाबत निर्णय झाला नाही. त्यावर राज्य सरकार व पीएमआरडीएने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी पीएमआरडी आयुक्त राहुल महिवाल यांच्यासोबत आमदार महेश लांडगे यांनी बैठक घेतली. या बैठकीत सदर प्रकल्प पीएमआरडीएने करावा. त्यामध्ये पीएमआरडीएला काही तांत्रिक अडचणी असतील, तर सदर संविधान भवनासाठी आरक्षीत केलेला भूखंड पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत करावा. त्या ठिकाणी महापालिका संविधान भवन उभारेल, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.



> जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतीय संविधानासह अन्य देशाच्या संविधानांचा अभ्यास सर्वसामान्य नागरिकांना करता यावा. या करिता पिंपरी-चिंचवडमध्ये "संविधान भवन" प्रस्तावित केले आहे. संविधान साक्षरता या हेतुने हाती घेतलेल्या या कामाला गती देण्याची आवश्यकता आहे. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले. पीएमआरडीए प्रकल्प उभारणीसाठी असक्षम असेल, तर सदर भूखंड पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे हस्तांतरित करावा, अशी मागणी आम्ही केली आहे. याबाबत आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व नगरविकास विभाग यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### नगर विकास विभागाकडे प्रस्ताव प्रलंबित...

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये सदर संविधान भवन व विपश्यना केंद्र प्रस्तावित असून, प्राधिकरणाच्या सभा क्र. ३३७ दि. २२ जानेवारी २०१९ च्या विषय क्रमांक ४ अन्वये ठराव मंजुर केला आहे. त्यानुसार, पेठ क्रमांक ११ मध्ये "संविधान भवन व विपश्यना केंद्र " उभारणीसाठी मान्यता दिली आहे. सदर दोन्ही प्रकल्प स्वतंत्रपणे विकसित करण्याची आवश्यकता आहे. प्रकल्प सल्लागार नियुक्ती व तज्ञ समितीची नेमणूक करण्यासह प्राधिकरण सभेची मान्यता मिळाली आहे. आता २०२१ मध्ये नवनगर प्राधिकरणाचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) मध्ये विलिनीकरण झाले आहे. त्यामुळे पीएमआरडीएने याबाबत पाठपुरावा करावा अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली. "संविधान भवन" च्या उभारणीसाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. तसेच, प्राधिकरण सभा क्र. ३३८ दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजी नुसार, DEMARCATION COPY साठी प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठवला आहे. त्यावर कार्यवाही करावी. या करिता शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

---

# 'ऐश्वर्यम हमारा' परिसरातील १५ हजार सदनिकाधारकांना दिलासा

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा 'फैसला ऑन दी स्पॉट'

### रस्त्याच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी, सोसायटी फेडरेशनच्या मागणीला यश

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**रस्ता हस्तांतराच्या प्रक्रियेअभावी जागा उपलब्ध न झाल्यामुळे ऐश्वर्यम हमारा सोसायटी व परिसरातील सदनिकाधारकांना हक्काचा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होता. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने या रस्त्याचा ताबा संबंधित विकसक यांनी महापालिका प्रशासनाला दिला. त्यामुळे सुमारे १५ हजार नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

चिखली येथील गट नं. ९४ मध्ये ऐश्वर्यम हमारा सोसायटीच्या मागील बाजूस असलेला रिव्हर लिगसी सोसायटीकडे जाणारा रस्ता संबंधित विकसकाच्या ताब्यात असल्यामुळे महापालिका प्रशासनाकडून विकसित केला जात नव्हता. याबाबत सोसायटीधारकांनी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनकडे मागणी केली होती.

त्याबाबत फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी ही बाब आमदार महेश लांडगे यांच्या निदर्शनास आणून दिली.



दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी ऐश्वर्यम हमारा प्रकल्पाचे विकसक सतीश अग्रवाल यांच्याशी बैठक केली. त्या बैठकीत तातडीने रस्ता हस्तांतरीत करावा आणि मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी सहकार्य करा, असे आवाहन केले. त्याला विकसक अग्रवाल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

या पार्श्वभूमीवर माजी महापौर राहुल जाधव यांच्या उपस्थितीमध्ये महापालिका शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे रस्ता हस्तांतराची कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे, निखील बोऱ्हाडे, सोसायटीचे चेअरमन निलेश खांडगे, सुजीत टेकवडे, सत्या त्रिपाटी, विलास घुले आदी उपस्थित होते.

> **भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये मोठे गृहप्रकल्प उभारले आहेत. २०१७ पासून या भागामध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे निर्माण करण्यासाठी चालना मिळाली. त्यामुळे 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी विकसक आणि सोसायटीधारकांमध्ये सकारात्मक समन्वयाअभावी काही प्रश्न आहेत. त्यामुळे सोसायटी फेडरेशनच्या समस्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न असतो. ऐश्वर्यम हमारा विकसकाच्या सकारात्मक भूमिकेमुळे जागा हस्तांतरीत झाली. त्यामुळे सुमारे १५ हजार सोसायटीधारकांना हक्काचा रस्ता उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला. याबद्दल महापालिका प्रशासन, सोसायटी फेडरेशन आणि विकसक यांचे आभार व्यक्त करतो.**
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




## भूमिका

# ‘गाळीव’ इतिहासाचे वर्तमान!

**वर्तमानात इतिहास का शिकायचा? कारण, इतिहासात झालेल्या चुका भविष्यात होणार नाहीत, याची काळजी घेता येते म्हणून आणि ताजा – अगदी पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचाही इतिहास शिकायचा, कारण कोणत्या आगळिका आपण कालपर्यंत करत होतो हे उमगावे म्हणून!**

त्यामुळेच इतिहासाचे पुनरावलोकन का करत राहायचे, हा पुढचा प्रश्न अधिक महत्त्वाचा. माहीत असलेल्या जुन्या माहितीबाबत नवीन तथ्ये सापडली, तर त्या माहितीत भर घालता येते आणि अगोदरच्या माहितीचे विश्लेषण अधिक चांगल्या आणि कधी कधी पूर्णपणे वेगळ्याही पद्धतीने करता येते, हा याचा फायदा. अर्थात, ही प्रक्रिया इतिहासकारांवर सोडून दिलेली बरी, कारण तेच उपलब्ध साधनांद्वारे त्याचे चांगले मूल्यमापन करू शकतात. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात ‘एनसीईआरटी’ने बारावीच्या राज्यशास्त्राच्या पुस्तकात जे बदल केले, त्याबाबत असेच केले असते किंवा या ‘स्वायत्त’ संस्थेच्या संचालकांनी अशा काही आधारांवर स्पष्टीकरण दिले असते, तर बरे झाले असते. त्याऐवजी, ‘दंगलींचा इतिहास का शिकायचा,’ असा प्रतिप्रश्न करून ‘एनसीईआरटी’च्या संचालकांनी ‘संस्कारी’ भूमिका घेतली. त्यामुळे त्याची दखल घेणे क्रमप्राप्त.एनसीईआरटी’च्या बारावीच्या राज्यशास्त्राच्या



पुस्तकात यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून काही ‘सुधारणा’ करण्यात आल्या आहेत. त्यातील अयोध्येवरील धड्याची लांबी कमी करण्यात आली आहे आणि तसे करताना बाबरी मशिदीचे पतन, ते घडण्याआधीच्या घडामोडी आणि नंतर झालेल्या दंगली हा भाग वगळण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २००२ मध्ये गुजरातमध्ये झालेल्या दंगलींचा भागही पुस्तकातून गाळण्यात आला आहे. इतकेच नाही, तर बाबरी मशिदीचा उल्लेखही नव्या सुधारित आवृत्तीत ‘तीन घुमट असलेली वास्तू’ असा करण्यात आला आहे. गेल्या वर्षीपर्यंत या धड्यात भारतीय जनता पक्षाची सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा, कारसेवकांची यातील भूमिका, बाबरी मशीद पडल्यानंतर झालेल्या दंगली, भाजपशासित राज्यांत आलेली राष्ट्रपती राजवट, ‘अयोध्येतील घटनांबद्दल भाजपने व्यक्त केलेले दु:ख’ आणि त्यावरून धर्मनिरपेक्षतेबाबत गांभीर्याने घडणाऱ्या चर्चेचा संदर्भ आदी सर्व भाग होता. यंदा मात्र त्यात बदल करून हा तपशील गाळला गेला. सुधारित धड्यात, ‘सन १९८६ मध्ये फैजाबाद (आता अयोध्या) जिल्हा न्यायालयाने लोकांना प्रार्थना करता यावी, यासाठी वास्तूचे कुलूप उघडण्याचे आदेश दिले. तीन घुमट असलेली वास्तू प्रभू श्रीरामाच्या जन्मभूमीच्या जागेवर, तेथील मंदिर पाडून उभारण्यात आल्याचे मानले जात असल्याने अनेक वर्षे तेथे वाद सुरू होता. मंदिरासाठी शिलान्यास होऊनही पुढच्या बांधकामावर मात्र बंदी होती…’ असे वर्णन येते. पुढे, ‘हिंदू-मुस्लिमांमध्ये जागेच्या हक्कांवरून वाद झाले, तसेच कायदेशीर लढाया झाल्या…’ आदी उल्लेख येतो, तर या उल्लेखांनंतर, ‘सन १९९२ मध्ये वास्तूचे पतन झाल्यानंतर काही टीकाकारांच्या मते, (या घटनेने) भारतीय लोकशाही तत्त्वांसमोर मोठे आव्हान उभे केले,’ असे म्हटले आहे. हे वर्णन खोटे किंवा चूक म्हणण्याचे कारणच नाही. मात्र, त्यासाठी १९९२ च्या प्रत्यक्ष घटनेचा संदर्भ वगळणे किंवा त्यानंतर झालेल्या दंगली आदींचा उल्लेखच न करणे अनाकलनीय. जुन्या पाठ्यपुस्तकात तर बाबरी मशीद पडल्यानंतरच्या दिवशी म्हणजे ७ डिसेंबर १९९२ ला विविध वृत्तपत्रांत छापून आलेल्या बातम्यांचे मथळेही कात्रणांसह नमूद केले होते. त्याचाही सुधारित आवृत्तीत समावेश नाही. हा समावेश न करण्याचे कारण स्पष्ट करताना ‘एनसीईआरटी’चे संचालक म्हणतात, की शाळांमध्ये दंगलींबाबत शिकविण्याची गरज नाही. मुद्दा असा आहे, की अयोध्या प्रश्न असो किंवा अन्य कोणतीही ऐतिहासिक घटना असो, त्यातील जी तथ्ये आहेत, त्यांचा उल्लेख केवळ त्यात हिंसेचा संदर्भ आहे म्हणून वगळणे कितपत तार्किक आहे? म्हणजे या तर्काने सर्व लढायांची वर्णनेही आपण वगळून टाकणार काहोण्याच्या उंबरठ्यावरील आहेत. त्यामुळे ‘बालमनावर परिणाम होईल, म्हणून हे संदर्भ नकोत,’ असा जर यामागचा युक्तिवाद असेल, तर तो हास्यास्पदच ठरेल. ‘आपल्याला सकारात्मक नागरिक घडवायचे आहेत.

## प्रासंगिक »

### परीक्षा पे चर्चा!

***नीट असो की नेट, राज्यपातळीवर पोलीस भरती असो की टीईटी, प्रवेशासाठी असो वा नोकऱ्यांसाठी परीक्षांची विश्वासार्हता टिकवण्याचा प्रश्न आहे...***

भारतात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी प्रवेशांसाठी एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला प्रवेश परीक्षा सुरू झाल्या; तेव्हा यापुढे घोकंपट्टी बंद होऊन खऱ्या गुणवत्तेचे चीज होईल, अशी आशा निर्माण झाली होती. पण नव्या शतकाची पंचविशी अजून होते ना होते, तोच या प्रवेश परीक्षांमुळे विद्यार्थ्यांवर नैराश्य झाकोळून आले आहे.“यूजीसी-नेट’ ही आणखी एक परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’ अर्थात ‘एनटीए’कडून या दोन्ही परीक्षा होतात. तब्बल ६७ विद्यार्थ्यांना मिळालेल्या पैकीच्या पैकी गुणांमुळे निर्माण झालेल्या शंका, वेळ कमी पडला म्हणून काही विद्यार्थ्यांना दिलेले वाढीव गुण, तसेच पेपरफुटीच्या शक्यता आणि त्या अनुषंगाने सुरू झालेले तपासचक्र यामुळे यंदाची ‘नीट’ परीक्षा वादाच्या भोवऱ्यात सापडली.

चीनची अर्थव्यवस्था गेल्या काही काळापासून अस्थिरता दिसून येते. अमेरिकेपाठोपाठ आता युरोपीय देशांसोबतही आर्थिक तणावाचा सामना चीनला करावा लागत आहे. सरकारच्या सर्व प्रयत्नांनंतरही रिअल इस्टेट क्षेत्रात मरगळ दिसते. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत मोठी पडझड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# चीनमधील आर्थिक अस्थिरता ठरणार डोकेदुखी!

जवळपास जगाच्या आर्थिक बाजारात आपला दबदबा ठेवणारे चीन सध्या आर्थिक अडचणीच्या कात्रीत अडकल्याचे चित्र दिसत आहे. पुढच्या वर्षी जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था थोडी घसरलेली दिसेल, यामध्ये अमेरिका आणि चीन सारख्या महासत्ताक देशांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. येणाऱ्या काळात चीनची परिस्थिती काहीसी ढासळलेली दिसेल असे भाकीत फिच यांनी वर्तवले आहे. फिच अमेरिका स्थित कॅपिटल मार्केट कंपनी आहे. फिचच्या आकड्यांनुसार पुढील वर्षी भारताचा जीडीपी वाढीचा अंद ७ टक्क्यावरून ७.५ पर्यंत वाढेल, पण २०२५ मध्ये जागतिक विकास दर २.४ टक्क्यापर्यंत घसरेल आणि असे फिचने अहवालात नमूद केले आहे. जागतिक स्तरावरील आर्थिक घट होण्यासाठी चीन आणि अमेरिका कारणीभूत असतील यासह स्थानिक श्रीमंतांमध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण होईल असे सुद्धा सांगण्यात आले आहे. फिच रिपोर्टमध्ये दावा केला आहे की, यंदा १५ हजार २००



श्रीमंत देश सोडतील तर मागील वर्षी १३ हजार ८०० श्रीमंतांनी चीनला टाटा बाय बाय केले होते. चीनमधील बहुसंख्याक श्रीमंतांनी चीनला सोडत अमेरिका, सिंगापूर आणि जपान या देशांना पसंती दिली त्यामागे कारणे अशी, की जपान आणि अमेरिका दोन्ही देश तंत्रज्ञानाने किंवा आर्थिक दृष्टीने चीनइतकेच प्रगत आहेत. जपानमधील जीवनशैली अतिशय जगभरात नावाजलेली आहे त्यामुळे जपानला चिनी नागरिकांनी पसंती दिली. सिंगापुरमधील संस्कृती चीनसोबत मिळती जुळती असल्याने तेथे सुद्धा चिनी नागरिकांनी जाण्यास पहिली पंसती दर्शवली आहे. चीनची अर्थव्यवस्था गेल्या काही काळापासून अस्थिरता दिसून येते. अमेरिकेपाठोपाठ आता युरोपीय देशांसोबतही आर्थिक तणावाचा सामना चीनला करावा लागत आहे. सरकारच्या सर्व प्रयत्नांनंतरही रिअल इस्टेट क्षेत्रात मरगळ दिसते. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत मोठी पडझड होण्याची शक्यता वर्तवली जाते. देशाच्या जीडीपीमध्ये रिअल इस्टेट क्षेत्राचा वाटा ३० टक्के आहे. यामुळेच मोठ्या प्रमाणात बँका कोलमडण्याचा धोका आहे. संपूर्ण जगाला भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुसाट वेगवान वाटचालीची खात्री पटली आहे. अलीकडेच एकीकडे सरकारने ८ टक्क्यांहून अधिक विकास दराचे आकडे जाहीर केले तर चालू आर्थिक वर्षासाठी जगभरातील रेटिंग एजन्सींनी भारताचा विकास दर सर्वात वेगवान असल्याचा विश्वास वर्तवला. भारतीय इकॉनॉमीच्या तुलनेत अमेरिका आणि युरोपचा विकास दर खूपच मागे तर चीनचा वेग सतत मंदावत आहे. जगाच्या व्यापाऱ्याच्या एक तृतीयांश हिस्सा चीनचा आहे. नोकऱ्या, निर्यात, वस्तूंची निर्मिती - जगातले अनेक देश चीनवर विविध कारणांसाठी अवलंबून आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मनोज जरांगेंचा सरकारवर गंभीर आरोप!

## मराठ्यांना आरक्षण मिळू न देण्यासाठी ही बैठक : मनोज जरांगे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ओबीसी नेत्यांची बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. ज्यानंतर याबाबत मनोज जरांगेंनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकारने आज घेतलेली बैठक ही पूर्णपणे मॅनेज केलेली बैठक.**



जातींमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी, मराठ्यांना आरक्षण मिळू न देण्यासाठी ही बैठक घेण्यात आली असा आरोप मनोज जरांगेंनी केला.कुणबी प्रमाणपत्रांची चौकशी होणार असेल तर मंडल आयोगाने दिलेलं १४ टक्के आरक्षणही घालवलं पाहिजे. वरचं तर बोगस आहेच. त्यात काही दुमत नाही. मराठे त्याबद्दल गप्प आहे. त्याच्यावरचं १६ टक्के आरक्षण बोगस असतं, सरकार एका बाजूने बोलणारं नसेल तर दूध का दूध आणि पानी का पानी केलं जाईल. श्वेतपत्रिका काढतील त्याचीही. १४ टक्क्यांचं १६ टक्के आणि त्यानंतर ५२ टक्के कसं झालं? १४ टक्के आरक्षणही रद्द करा हीपण आमची मागणी आहे. मंडल आयोगाने आरक्षण दिलं तेव्हा सर्व्हे, जातनिहाय जनगणना सगळं केलं असेल. ओबीसींची यादीही तयार असेल. जनगणना त्यांनी स्वतः केली की इंग्रजांची घेतली. जर खोटं असेल तर ते १४ टक्के आरक्षणही रद्द झालं पाहिजे. इंग्रजांची जनगणना खरी आणि आमची १८८४ च्या मराठ्यांच्या नोंदी खोट्या असं कसं चालेल?" असा प्रश्न मनोज जरांगेंनी विचारला.बाकीच्या संस्थांना फायदा मिळतोय तसं सारथीतून सगळ्यांना फायदा मिळाला हे आम्हीही सांगितलं. छगन भुजबळचं काय बोलायचं? तो काहीही रद्द करा म्हणतोय. त्याने सगळ्या जाती एकमेकांच्या अंगावर घातल्या आहेत. तो म्हणतोय रद्द करा हा जातीयवाद नाही का? सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणीत ओबीसी बांधवांचाही फायदा होणार आहे. ते तो रद्द करा म्हणतोय. याची मागणीच अशी असते ज्यात काही तथ्य नसतं. मराठ्यांचं वाटोळं होईल अशी त्याची (छगन भुजबळ) एक तरी मागणी असतेच. मराठ्यांच्या मागण्यांना विरोध करायचा हा भुजबळांचा धंदाच झाला आहे." अशी टीका मनोज जरांगेंनी केली."लक्ष्मण हाके आत्ता सगळ्यांचा आदर करत आहेत, मी १० महिन्यांपासून आदरच करतो आहे. मी सगळ्यांचा सन्मानच राखला आहे. मी गोरगरीब मराठ्यांना आरक्षण मिळावं म्हणून भांडतोय आणि तुम्ही मिळू नये म्हणून भांडत आहात. ब्र शब्दाने मी कुणाला दुखावलं नाही. त्या एकट्याला (भुजबळ) सोडून. जातीयवाद होऊ नये यासाठी एकत्र बसायचं जर सरकार आणि ओबीसींमध्ये ठरलं असेल तर आम्हीही तयार आहोत. आम्हाला कुठे जातीयवाद करायचा आहे?" असंही मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.छगन भुजबळ काय सांगतो आमचा काही त्याच्यावर भरवसा नाही. मराठा आणि कुणबी एकच आहेत हे सिद्ध कसं करायचं? सिद्ध करावं लागेलच. आमचं म्हणणं आहे मराठा आणि कुणबी एकच आहेत. तुमचं म्हणणं आहे नाही. नाही तर तसं सिद्ध करुन द्या आम्हाला. आहेत कसे आम्ही सांगतो. मी आंदोलन लावून धरलं, समाजाने आंदोलन लावून धरलं. त्यानंतर नोंदी निघाल्या, तसं तुम्ही सिद्ध करा. मराठा-कुणबी एकच आहेत मी सिद्ध करतो. ही जी बैठक झाली ती मॅनेज केलेली बैठक होती. मराठ्यांना आरक्षण मिळू नये यासाठी ठरवून बैठक घेण्यात आली. मराठ्यांना सगे सोयऱ्यांचं आरक्षणही द्यायचं नाही, सारथीच्या योजनाही द्यायच्या नाहीत. महामंडळाच्या योजना द्यायच्या नाही ही मराठाविरोधी ठरवून बैठक होती. असा गंभीर आरोप मनोज जरांगेंनी केला आहे. सरकारमधल्या मंत्र्यांनी ज्यांनी मराठ्यांच्या द्वेषापोटी आंदोलन बसवलं त्यांनीच ही बैठक बसवली होती असाही आरोप जरांगेंनी केला.जातींमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी, मराठ्यांना आरक्षण मिळू न देण्यासाठी ही बैठक घेण्यात आली असा आरोप मनोज जरांगेंनी केला.मराठे त्याबद्दल गप्प आहे. त्याच्यावरचं १६ टक्के आरक्षण बोगस असतं, सरकार एका बाजूने बोलणारं नसेल तर दूध का दूध आणि पानी का पानी केलं जाईल. श्वेतपत्रिका काढतील त्याचीही.१६ टक्के आणि त्यानंतर ५२ टक्के कसं झालं? आरक्षणही रद्द करा हीपण आमची मागणी आहे.

### ब्र शब्दाने मी कुणाला दुखावलं नाही

जातनिहाय जनगणना सगळं केलं असेल. ओबीसींची यादीही तयार असेल. जनगणना त्यांनी स्वतः केली की इंग्रजांची घेतली. जर खोटं असेल तर ते १४ टक्के आरक्षणही रद्द झालं पाहिजे. इंग्रजांची जनगणना खरी आणि आमची १८८४ च्या मराठ्यांच्या नोंदी खोट्या असं कसं चालेल?" असा प्रश्न मनोज जरांगेंनी विचारला.बाकीच्या संस्थांना फायदा मिळतोय तसं सारथीतून सगळ्यांना फायदा मिळाला हे आम्हीही सांगितलं. छगन भुजबळचं काय बोलायचं? तो काहीही रद्द करा म्हणतोय. त्याने सगळ्या जाती एकमेकांच्या अंगावर घातल्या आहेत. तो म्हणतोय रद्द करा हा जातीयवाद नाही का? सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणीत ओबीसी बांधवांचाही फायदा होणार आहे. ते तो रद्द करा म्हणतोय. याची मागणीच अशी असते ज्यात काही तथ्य नसतं. मराठ्यांचं वाटोळं होईल अशी त्याची (छगन भुजबळ) एक तरी मागणी असतेच. मराठ्यांच्या मागण्यांना विरोध करायचा हा भुजबळांचा धंदाच झाला आहे." अशी टीका मनोज जरांगेंनी केली."लक्ष्मण हाके आत्ता सगळ्यांचा आदर करत आहेत, मी १० महिन्यांपासून आदरच करतो आहे. मी सगळ्यांचा सन्मानच राखला आहे. मी गोरगरीब मराठ्यांना आरक्षण मिळावं म्हणून भांडतोय आणि तुम्ही मिळू नये म्हणून भांडत आहात. ब्र शब्दाने मी कुणाला दुखावलं नाही.

# गुन्हेगारी कायद्यांचा फेरआढावा घ्या!

## घाईने मंजूर केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी पुढे ढकला; ममतांचे मोदींना पत्र

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून येत्या १ जुलै रोजी लागू होणार असलेल्या तीन गुन्हेगारी कायद्यांची अंमलबजावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. ही विधेयके 'घाईघाईने मंजूर' केली असल्याने नव्या संसदेने या कायद्यांचा फेरआढावा घ्यावा, अशी बॅनर्जी यांची मागणी आहे.**



तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय साक्ष्य अधिनियम २०२३ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता या तीन कायद्यांच्या येऊ घातलेल्या अंमलबजावणीबद्दल 'गंभीर चिंता' व्यक्त केली. ज्या वेळी लोकसभेत ही तिन्ही विधेयके मंजूर झाली त्या वेळी १४६ खासदार निलंबित होते, याकडे बॅनर्जी यांनी पत्राद्वारे लक्ष वेधले.

ममता यांनी पत्रात लिहिले होते की तुमच्या मावळत्या सरकारने ही तीन गंभीर विधेयके एकतर्फी आणि कोणत्याही चर्चेशिवाय मंजूर केली होती. त्या दिवशी, लोकसभेतील जवळपास १०० सदस्य निलंबित करण्यात आले होते आणि दोन्ही सभागृहांतील एकूण १४६ खासदारांना संसदेतून बाहेर काढण्यात आले होते. त्या 'लोकशाहीच्या अंधाऱ्या काळात' ही तीन विधेयके 'हुकूमशाही पद्धतीने' मंजूर करण्यात आल्याची टिप्पणी त्यांनी केली. हे प्रकरण आता पुनरावलोकनास पात्र आहे, असेही त्या म्हणाल्या. नव्याने विचारमंथन आणि छाननीसाठी नवनिर्वाचित संसदेसमोर महत्त्वपूर्ण कायदेविषयक बदल करण्याची आवश्यकता असल्यावर ममतांनी भर दिला. कोणत्याही दूरगामी कायदेशीर बदलासाठी प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी अगोदरच बारकाईने पायाभूत काम करणे आवश्यक आहे आणि असा गृहपाठ टाळण्यामागे कोणतेही कारण नाही, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. 'ही विधेयके स्थगित करावीत, या स्थगितीमुळे नवे संसदीय पुनरावलोकन सक्षमपणे होईल. कायदेशीर व्यवस्थेवर जनतेचा विश्वास दृढ होईल आणि देशात कायद्याचे राज्य टिकवून ठेवेल,' असेही त्यांनी मोदी यांना पत्राद्वारे कळविले आहे.

### हुकूमशाही पद्धतीने मंजुरी

मावळत्या सरकारने ही तीन गंभीर विधेयके एकतर्फी आणि कोणत्याही चर्चेशिवाय मंजूर केली होती. त्या दिवशी, लोकसभेतील जवळपास १०० सदस्य निलंबित करण्यात आले होते आणि दोन्ही सभागृहांतील एकूण १४६ खासदारांना संसदेतून बाहेर काढण्यात आले होते. त्या 'लोकशाहीच्या अंधाऱ्या काळात' ही तीन विधेयके 'हुकूमशाही पद्धतीने' मंजूर करण्यात आल्याची टिप्पणी ममता बॅनर्जी यांनी पत्रात केली आहे.

# सीएसआयआर नेट परीक्षा पुढे ढकलली!

## केंद्र सरकारने यूजीसी नेट परीक्षा रद्द केल्याची घोषणा केली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशात सध्या यूजीसी नेट परीक्षेवरून चांगलचा गोंधळ सुरू आहे. या परिक्षेचा पेपर फुटल्याचा संशयानंतर केंद्र सरकारने यूजीसी नेट परीक्षा रद्द केल्याची घोषणा दोन दिवसांपूर्वी केली. त्यानंतर आता आज सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्याची घोषणा नॅशनल टेस्टिंग एजन्सीने केली आहे. यासंदर्भात नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एक पत्रक जारी केलं आहे. तसेच सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे का ढकलण्यात आली? याचेही स्पष्टीकरण देण्यात आले आहे.**



यासंदर्भात नॅशनल टेस्टिंग एजन्सीने आज २१ जून रोजी एक पत्रक प्रसिद्ध केलं आहे. त्यामध्ये सांगितंल की, या निर्णयामागे लॉजिस्टिक समस्येचे कारण असून काही अपरिहार्य कारणामुळे ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली असल्याचं सांगण्यात आलं आहे. दरम्यान, ही सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा २५ जून ते २७ जून या कालावधीत होणार होती. मात्र, या परीक्षेला अवघे काही दिवस बाकी असताना आता परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा केली आहे.सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्यानंतर आता ही परीक्षा कधी होणार असा सवाल अनेकांनी केला आहे. मात्र, यासंदर्भात परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली आहे. आज जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलं आहे की, सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. तरी पुढील परीक्षेसंदर्भातील माहिती सीएसआयआर यूजीसी नेटच्या अधिकृत वेबसाइट CSIRNET. NTA.AC.IN वर देण्यात येईन. दरम्यान, देशातील सर्वात मोठी परीक्षा एजन्सी परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यात असमर्थ ठरत असल्याची टीका आता होत आहे. UGC-NET 2024 मंगळवारी (१८ जून) विद्यापीठ अनुदान आयोग-राष्ट्रीय पात्रता परीक्षा (यूजीसी नेट) ही परीक्षा पार पडली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे बुधवारी शिक्षण मंत्रालयाने परिपत्रक काढत ही परीक्षा रद्द केली. केंद्रीय गृह मंत्रालयाला या परीक्षेत अनियमितता आढळून आली. मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या भारतीय सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेंटरच्या नॅशनल सायबर क्राईम थ्रेट ॲनालिटिक्स युनिटला परीक्षेविषयी महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली. ज्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. परीक्षा रद्द झाल्यामुळे या वर्षी परीक्षेला बसलेल्या नऊ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मोठा फटका बसला आहे. या निर्णयाला विद्यार्थी संघटनांनी विरोध दर्शविला आहे.

### परीक्षा कधी होणार?

सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्यानंतर आता ही परीक्षा कधी होणार असा सवाल अनेकांनी केला आहे. मात्र, यासंदर्भात परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली आहे. आज जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलं आहे की, सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. तरी पुढील परीक्षेसंदर्भातील माहिती सीएसआयआर यूजीसी नेटच्या अधिकृत वेबसाइट CSIRNET.NTA.AC.IN वर देण्यात येईन. दरम्यान, देशातील सर्वात मोठी परीक्षा एजन्सी परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यात असमर्थ ठरत असल्याची टीका आता होत आहे. दरम्यान, ही सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा २५ जून ते २७ जून या कालावधीत होणार होती. मात्र, या परीक्षेला अवघे काही दिवस बाकी असताना आता परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा केली आहे.सीएसआयआर यूजीसी नेट २०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्यानंतर आता ही परीक्षा कधी होणार असा सवाल अनेकांनी केला आहे. मात्र, यासंदर्भात परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली आहे. आज जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

आता विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा परीक्षा द्यावी लागणार आहे. काही दिवसांपूर्वी नीट-यूजीचे कथित पेपर लीक प्रकरण समोर आल्यानंतर वाढीव गुण देण्यात आलेल्या १,५६३ विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागेल हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर आता यूजीसी नेट परीक्षेतही असेच काहीसे घडल्याने देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे२१ जून रोजी एक पत्रक प्रसिद्ध केलं आहे. त्यामध्ये सांगितंल की, या निर्णयामागे लॉजिस्टिक समस्येचे कारण असून काही अपरिहार्य कारणामुळे ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली असल्याचं सांगण्यात आलं आहे.

# जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक लवकरच

## 20 ऑगस्टपर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या आयोगाच्या सूचना

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभेची निवडणूक झाली. आता लवकरच जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या चार राज्याच्या विधासभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. या राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी आयोगाकडून निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासंदर्भात सूचना जारी करण्यात आल्या आहेत.**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने २० ऑगस्टपर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.सध्या जम्मू-कश्मीरमध्ये २०१८ पासून विधानसभा अस्तित्वात नाही. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला जम्मू-काश्मीरमधील विधानसभेच्या निवडणुका सप्टेंबरपर्यंत घेण्यात याव्यात, असा आदेश देण्यात आलेला आहे.

त्यामुळे निवडणूक आयोग आता विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागले आहे. जम्मू-काश्मीर बरोबरच महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या राज्यांच्याही निवडणुकांच्या तारखा निवडणूक आयोग जाहीर करण्याची शक्यता आहे.कारण




हरियाणा विधानसभेचा कार्यकाळ ३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. तसेच झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ रोजी संपत आहे.

तसेच महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे या निवडणुका निवडणूक आयोगाला घ्याव्या लागणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून या चारही राज्यातील निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी सुरू करण्यात आली आहे.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, निवडणूक आयोगाने जम्मू आणि काश्मीरसह महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना गुरुवारी एक पत्र लिहिलं आहे. या पत्राच्या माध्यमातून संभाव्य तारखा देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच २५ जूनपासून निवडणूक पूर्व विशेष मोहीम सुरु होईल. त्यानंतर मतदार याद्या अद्ययावत करण्यात येतील. तसेच २५ जुलैला प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर मतदरांना ९ ऑगस्टपर्यंत हरकती घेता येतील. त्यानंतर २० ऑगस्टपर्यंत अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील.

### निवडणूक आयोगाकडून तयारी सुरु

याबरोबरच महाराष्ट्र, झारखंड आणि हरियाणा या राज्यांच्याही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी पत्र देण्यात आले असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता निवडणूक आयोग चार राज्यांतील निवडणुकांच्या तारखा लवकरच जाहीर करण्याची शक्यता आहे.लोकसभेची निवडणूक झाली. आता लवकरच जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या चार राज्याच्या विधासभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. या राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे.

# कोणी कोणाला अनफॉलो केलं?



मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीचा अभिनेता, छोटा पडदा गाजवणाऱ्या सुयश टिळकचा आज वाढदिवस आहे. एकीकडे अभिनेत्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. तर दुसरीकडे त्याच्या खास व्यक्तीने मात्र त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिलेल्या नाहीत. अभिनेता सुयश टिळक आणि आयुषी भावे 21 ऑक्टोबर 2021 रोजी लग्नबंधनात अडकले. कोरोनाकाळात जवळचे मित्रमंडळी आणि कुटुंबियांच्या उपस्थितीत त्यांचा लग्नसोहळा पार पडला. सुयश आणि आयुषीचा 7 जुलैला साखरपुडा झाल्यानंतर ते कधी लग्न करणार याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर सुयश आणि आयुषीने लग्नसोहळ्याचे फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. पण आता लग्नाच्या तीन वर्षांनंतर सुयश आणि आयुषीचं बिनसलं असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे. सुयश टिळक आणि आयुषी भावे दोघेही सोशल मीडियावर खूप ॲक्टिव्ह आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून ते चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. पण गेल्या काही दिवसांपासून त्यांनी एकमेकांसोबतचे फोटो शेअर केलेले नाहीत. आयुषी भावेने तिचं यूझर नेम 'आयुषी भावे टिळक' असंच ठेवलं आहे. तसेच ती सुयश टिळकला फॉलोदेखील करते. पण सुयश टिळकने मात्र आयुषीला अनफॉलो केलं आहे. त्यामुळे आता सुयश आणि आयुषीचा घटस्फोट होणार का? असा प्रश्न नेटकऱ्यांकडून उपस्थित होत आहे. आयुषी भावेसोबत संसार थाटण्याआधी सुयशचं नाव पाठकबाई अर्थात 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेच्या माध्यमातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री अक्षया देवधरसोबत जोडलं गेलं होतं. त्यांनी त्यांच्या नात्याला अधिकृत दुजोरा दिला नव्हता. पुढे अक्षया आणि सुयशचं बिनसलं आणि त्यांचा ब्रेकअप झाला.

# नेटफ्लिक्सला बॉयकॉट करण्याची मागणी



नेटफ्लिक्स (NETFLIX) या ओटीटी प्लॅटफॉर्मवर विविध वेब सीरिज आणि चित्रपट रिलीज होत असतात. सध्या ट्विटरवर म्हणजेच X या प्लॅटफॉर्मवर बॉयकॉट नेटफ्लिक्स हा हॅशटॅग ट्रेंड होत आहे. नेटकरी नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी नेटकरी करत आहेत. अभिनेत्री नयनताराच्या अन्नपूर्णी (ANNAPOORANI) या चित्रपटामधील संवादामुळे नेटकरी नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी करत आहेत. बॉयकॉट नेटफ्लिक्स हा हॅशटॅग आणि नयनताराचा अन्नपूर्णी हा चित्रपट यामध्ये कनेक्शन काय आहे? हे नेमकं प्रकरण काय आहे? याबाबत जाणून घेऊयात... नयनताराचा अन्नपूर्णी हा चित्रपट नुकताच नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. तेव्हापासून नेटफ्लिक्सचा बॉयकॉट सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. "राम मांसाहारी होता", असा संवाद अन्नपूर्णी या चित्रपटामध्ये घेण्यात आलाय. त्यामुळे हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, असा आरोप अनेकांनी चित्रपटाच्या टीमवर केला आहे. अशताच आता ट्विटरवर अनेकांनी ट्वीट शेअर करुन नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी अनेक नेटकरी करत आहेत. एका नेटकऱ्यानं ट्वीटमध्ये लिहिलं, "नेटफ्लिक्स इंडिया आम्ही तुम्हाला कडक इशारा देत आहोत. तुमचा हा चित्रपट ताबडतोब काढून टाका अन्यथा कायदेशीर परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहा." तर दुसऱ्या युझरनं ट्वीटमध्ये लिहिलं, 'राम, लक्ष्मण आणि सीता यांनी नवसात मांस खाल्ले होते, NETFLIX हे काय आहे? कलेच्या नावाखाली काय दाखवले जात आहे?' एका हिंदू संघटनेने जबलपूरमध्ये 'अन्नपूर्णी' या चित्रपटाची संपूर्ण स्टारकास्ट, निर्माता आणि दिग्दर्शकाविरोधात एफआयआर दाखल केला आहे. अन्नपूर्णी चित्रपटात अशी अनेक दृश्ये आहेत, ज्यात भगवान श्री राम यांच्याबद्दल अयोग्य टिप्पणी करून हिंदूंच्या भावना दुखावल्या गेल्याचे या एफआयआरमध्ये सांगण्यात आले आहे.

# जान्हवीने केलं साराला अनफॉलो!

सारा तेंडुलकर नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. कधी तिच्या लूकमुळे तर कधी शुभमन गिलमुळे ती चर्चेत असते. क्रिकेट वर्ल्डकप 2023 मध्ये सारा उपस्थित होती. त्यामुळेही तिची बरीच चर्चा झाली. पण आता जी बातमी समोर येत आहे त्यामध्ये सारा चर्चेत आलीय ती जान्हवी कपूरमुळे. सारा - जान्हवीमध्ये बिनसलं असल्याची चर्चा आहे. काय झालंय नेमकं? आम्ही सांगतो. अलीकडेच सारा तेंडूलकर जान्हवी कपूरचा बॉयफ्रेंड शिखर पहाडियासोबत पार्टी करताना दिसली होती. त्यानंतर बातमी येत आहे की, जान्हवी कपूरने सारा तेंडुलकरला इन्स्टाग्रामवर अनफॉलो केले आहे. त्यामुळे बी टाऊनमध्ये वेगळीच चर्चा सुरु झालीय. सध्या बॉलिवूडमध्ये जान्हवी कपूर आणि शिखर पहाडिया यांच्या नात्याची चर्चा आहे. जान्हवी कपूरने अलीकडेच 'कॉफी विथ करण'मध्ये शिखरसोबत रोमान्स केल्याच्या बातमीला दुजोरा दिला होता. यादरम्यान जान्हवीने शिखरला शिखरू म्हटले होते, त्यानंतर त्यांच्या नात्यांवर आणखीनच शिक्कामोर्तब झाला. एकीकडे जान्हवीने शिखर सोबतच्या नात्याची पुष्टी केली आहे. तर दुसरीकडे शिखर सारा तेंडूलकरसोबत पार्टी करताना दिसला.



# किरण गायकवाडचा डॅशिंग अंदाज

छोट्या पडद्यावरील 'देवमाणूस' या मालिकेतील भूमिकेतून घरोघरी पोहोचलेला किरण गायकवाड हा गेल्या काही दिवसांपासून विविध चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. प्रवास नवोदितांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. किरणच्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. किरणच्या 'नाद - द हार्ड लव्ह' असं शीर्षक असलेल्या आगामी मराठी चित्रपटाचा नुकताच मुहूर्त झाला असून, या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. शकुंतला क्रिएशन प्रोडक्शन आणि जिजाऊ क्रिएशन मेकर या निर्मिती संस्थांतर्गत 'नाद' या चित्रपटाची निर्मीती करण्यात येत आहे. संजय बाबुराव पगारे आणि रुपेश दिनकर पगारे या चित्रपटाचे निर्माते असून, दिग्दर्शनाची धुरा 'मिथुन', 'रांजण', 'बलोच' फेम प्रकाश जनार्दन पवार यांनी सांभाळली आहे.

# हृतिकच्या वाढदिवसानिमित्त सबाची खास पोस्ट

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता हृतिक रोशनचा (HRITHIK ROSHAN) आज 50 वा वाढदिवस आहे. हृतिकच्या वाढदिवसानिमित्ताने त्याच्या चाहत्यांपासून ते बॉलिवूड सेलिब्रिटींपर्यंत अनेक जणांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करुन हृतिकला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हृतिकची गर्लफ्रेंड सबा आझादनेही (SABA AZAD) एक खास व्हिडीओ शेअर करुन हृतिकला शुभेच्छा दिल्या आहेत. तिनं शेअर केलेल्या या व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. हृतिकची गर्लफ्रेंड सबा आझादने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हृतिक रोशनच्या वाढदिवसानिमित्त एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये हृतिक आणि सबा हे बाल्कनीत उभे राहिलेले दिसत आहेत. व्हिडीओमध्ये दोघेही लिप लॉक करताना दिसत आहेत. या रोमँटिक व्हिडीओला सबानं खास कॅप्शन देखील दिलं आहे. तिनं कॅप्शनमध्ये लिहिलं, "वाढदिवसाच्या शुभेच्छा माय लव्ह." सबा आझादने शेअर केलेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. हृतिकच्या एक्स वाईफ सुझान खाननं देखील खास पोस्ट शेअर करुन हृतिकला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सुझान खाननं शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये हृतिक आणि त्याच्या मुलांचे काही खास फोटो आहेत. या फोटोला सुझाननं कॅप्शन दिलं, "वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. तू 50 व्या वर्षी देखील 30 वर्षांचा दिसतो." हृतिक रोशन आणि सुझान खान यांनी 2000 मध्ये लग्नगाठ बांधली. पण या जोडप्याने 2014 मध्ये घटस्फोट घेतला.

# मारक्रमच्या अफलातून कॅचने फिरली मॅच!

## उत्कंठावर्धक लढतीत आफ्रिकेचा इंग्लंडवर 7 धावांनी विजय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी शानदार कामगिरी करत अखेरच्या दोन षटकांत इंग्लंडच्या जबड्यातून विजय हिसकावून आणला. टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये एकही सामना न गमावलेल्या दक्षिण आफ्रिकेने उत्कंठावर्धक सामन्यात इंग्लंडवर ७ धावांनी विजय मिळवला. कगिसो रबाडा आणि मार्को यान्सन यांच्या १८व्या आणि १९व्या षटकाने दक्षिण आफ्रिकेला सामन्यात परत आणले. तर नॉर्कियाने अखेरच्या सामन्यात शानदार गोलंदाजी केली. या षटकातील मारक्रमच्या झेलने सामना फिरवला.**





इंग्लंडचा संघ ४ बाद ६१ धावांवर होता. त्यानंतर लियाम लिव्हिंगस्टोन आणि हॅरी ब्रुक यांनी शानदार भागीदारी रचत इंग्लंडला सामन्यात परत आणले पण विजय मिळवून देऊ शकले नाहीत. १७ व्या षटकात बार्टमनने २१ धावा देत सामना इंग्लंडच्या बाजूने वळवला पण आफ्रिकेच्या रबाडाने आपली कामगिरी पार पाडली. त्याने १८व्या षटकात दुसऱ्याच चेंडूवर त्याने लिव्हिंगस्टोनला स्ट्ब्सकरवी झेलबाद केले आणि इंग्लंडला मोठा धक्का दिला. यासह या षटकात त्याने अवघ्या ४ धावा दिल्या. यानंतर यान्सनने १९व्या षटकात अवघ्या ७ धावा देत मोठा फटका खेळण्याची एकही संधी दिली नाही आणि इथे इंग्लंडचा संघ मागे पडला. अखेरच्या षटकात १४ धावांची गरज असताना नॉर्कियाच्या पहिल्याच चेंडूवर हॅरी ब्रुक झेलबाद झाला. मागे धावत जात मारक्रमने उत्कृष्ट क्षेत्ररक्षण करत सीमारेषेवर अनपेक्षित झेल टिपला. हॅरी ब्रुक अर्धशतक झळकावत ३७ चेंडूत ७ चौकारांसह५३ धावांवर झेलबाद झाला आणि इथेच सामना फिरला. मारक्रमच्या या झेलने सामना आफ्रिकेच्या खिशात घातला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर एक चौकार सॅम करनने लगावला. पण यानंतर नॉर्कियाने चांगली गोलंदाजी करत धावा रोखल्या आणि संघाला अखेरीस ७ धावांनी विजय मिळवून दिला. तर आफ्रिकेला चांगली सुरूवात करून देणाऱ्या क्विंटन डीकॉकला सामनावीराचा पुरस्कार मिळाला.

आफ्रिकेने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरूवात फारच खराब झाली.

संघाचे टॉप ४ फलंदाज २० धावांचा आकडाही गाठू शकले नाहीत आणि स्वस्तात बाद झाले. यानंतर आलेल्या हॅरी ब्रुक आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांच्यातील मोठ्या भागीदारीने इंग्लंडला सामन्यात परत आणले हे दोघेही बाद झाल्यानंतर इंग्लंडने हाता-तोंडाशी आणलेला सामना गमावला. आफ्रिकेकडून सर्वच गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. कगिसो रबाडा आणि केशव महाराज आणि प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या तर बार्टमन आणि नॉर्किया यांच्या खात्यात एक विकेट आहे. मार्को यान्सेन विकेट घेतली नसली तरी त्याने १९वे षटक इतके जबरदस्त टाकले की आफ्रिकेने सामन्यात कमबॅक केले.

तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेची सुरूवात तशी चांगली झाली. संघाचा सलामीवीर क्विंटन डीकॉकने शानदार फटकेबाजी वेगवान अर्धशतक झळकावले. त्याने २२ चेंडूत अर्धशतक झळकावले. तर ३८ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६५ धावा केल्या. तर रीझा हेंड्रिक्सने १९ धावांचे योगदान दिले. तर मिलर आणि क्लासेन एक धाव चोरत असताना क्लासेन धावबाद झाला. यानंतर मिलरने २८ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या आणि संघाला १५० पार नेले.

मारक्रम आणि यान्सन स्वस्तात बाद झाले. यासह दक्षिण आफ्रिकेच्या धावांवर अंकुश ठेवत इंग्लंडने चांगली गोलंदाजी केली आणि आफ्रिकेचा संघ केवळ १६३ धावाच करू शकला.

### जोफ्रा आर्चरने 3 विकेट्स घेतल्या

इंग्लंडकडून जोफ्रा आर्चरने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या तर मोईन आणि आदिल रशीदने १-१ विकेट मिळवली.दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी शानदार कामगिरी करत अखेरच्या दोन षटकांत इंग्लंडच्या जबड्यातून विजय हिसकावून आणला. टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये एकही सामना न गमावलेल्या दक्षिण आफ्रिकेने उत्कंठावर्धक सामन्यात इंग्लंडवर ७ धावांनी विजय मिळवला. कगिसो रबाडा आणि मार्को यान्सन यांच्या १८व्या आणि १९व्या षटकाने दक्षिण आफ्रिकेला सामन्यात परत आणले. तर नॉर्कियाने अखेरच्या सामन्यात शानदार गोलंदाजी केली.त्यानंतर लियाम लिव्हिंगस्टोन आणि हॅरी ब्रुक यांनी शानदार भागीदारी रचत इंग्लंडला सामन्यात परत आणले पण विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

# पंचांनी मसूदला धावबाद घोषित केले नाही

## हिट विकेट मग रनआऊट तरी कसा नॉटआऊट राहिला बॅट्समन

।नवी दिल्ली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटचा सामना सुरू असताना कधी कधी अशा काही घटना घडतात की आपल्याला चकित करतात. अशीच एक घटना टी-२० ब्लास्ट टूर्नामेंटमध्ये घडली आहे. त्याच चेंडूवर पाकिस्तानचा कसोटी कर्णधार शान मसूदची एकाच चेंडूवर हिट विकेट धावबादही झाला. पण बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतला नाही. हे पाहून सर्वच जण आश्चर्यचकित झाले आहेत. पण शान मसूदला पंचांनी बाद का दिले नाही? यामागचं कारण काय आहे, जाणून घ्या.**



पाकिस्तानचा फलंदाज शान मसूद टी-२० ब्लास्टमध्ये यॉर्कशायरकडून खेळत आहे. २० जून रोजी त्याच्या संघाचा सामना लँकेशायरशी झाला. या सामन्यात शानने उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. तो ३६ चेंडूत ५८ धावा करत खेळत होता. त्यानंतर जॅक ब्लॅंदरविकच्या चेंडू स्कूप करण्याचा त्याने प्रयत्न केला. या प्रयत्नात त्याच्या पायाचा विकेटला स्पर्श झाला. मात्र त्यानंतर अंपायरने नो बॉलचा इशारा दिला. पण स्वत:ला आऊट समजून त्याने क्रीज सोडली आणि लँकेशायरच्या क्षेत्ररक्षकाने त्याला धावबाद केले. नो बॉलमुळे शान मसूद हिट विकेट होण्यापासून वाचला पण नंतर तो रनआउट झाला. मात्र, त्यानंतरही तो पॅव्हेलियनमध्ये परतला नाही. क्रिकेटच्या नियमानुसार फलंदाज नो बॉलवर धावबाद होऊ शकतो. पण इथे आयसीसीच्या नियम ३७.१ ने शान मसूदला वाचवले. शान मसूदने आउट झाल्याचे समजत त्याने क्रीज सोडली. तो धाव काढत नव्हता आणि याच कारणामुळे पंचांनी त्याला पॅव्हेलियनमध्ये परत जाऊ दिले नाही.आयसीसीच्या नियमानुसार (कायदा ३१.७), जर फलंदाजाने आपण आऊट आहोत असा विचार करून क्रीज सोडली, तर यादरम्यान फलंदाजाला रनआउट दिले जात नाही. यामुळेच पंचांनी मसूदला धावबाद घोषित केले नाही. त्याचवेळी अंपायरनेही हा चेंडू डेड बॉल घोषित केला होता. शान मसूदला नाबाद घोषित केल्याचा निर्णय देण्यात आला तेव्हा लँकेशायरच्या खेळाडूंनी आश्चर्य व्यक्त केले. असा नियम आहे.

### एकाच चेंडूवर हिट विकेट धावबादही

यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. विरोधी संघाचे खेळाडूही पंचांकडून नियम समजून घेण्याचा प्रयत्न करताना दिसले. या सामन्यात शान मसूदने ६१ धावांची उत्कृष्ट खेळी खेळली आणि आपल्या संघाला विजयापर्यंत नेले. या सामन्यात यॉर्कशायर संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ विकेट गमावत १७३ धावा केल्या, त्यानंतर लँकेशायर संघ केवळ १६६ धावा करू शकला आणि यॉर्कशायर संघ सामना जिंकण्यात यशस्वी ठरला.क्रिकेटचा सामना सुरू असताना कधी कधी अशा काही घटना घडतात की आपल्याला चकित करतात. अशीच एक घटना टी-२० ब्लास्ट टूर्नामेंटमध्ये घडली आहे. त्याच चेंडूवर पाकिस्तानचा कसोटी कर्णधार शान मसूदची एकाच चेंडूवर हिट विकेट धावबादही झाला.